SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell – 2609148
Website : www.unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष :२६०९१४८
ई—मेल : spcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र.विशेष कक्ष/सर्व.मह./भेट/327 दिनांक— 17 JUN 2019

प्रति,

मा. प्राचार्य / सचिव,

सर्व संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्था

विषय : संलग्नित महाविद्यालयांमध्ये स्थानिक निवड समितीद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या तासिका तत्वावरील शिक्षकांच्या जाहिरात प्रस्तावांसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत..

महोदय / महोदया,

आपणास विदितच आहे की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये स्थानिक निवड समितीद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरावयाच्या तासिका तत्वावरील शिक्षकांच्या भरतीसंदर्भात शासनाने क्र. संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि. १४.११.२०१८ रोजीचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. या अनुषंगाने दि. १२.६.२०१९ रोजी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे समवेत विद्यापीठ प्रशासनाची बैठक झालेली आहे. याबाबत सर्व संलग्नित संस्था/महाविद्यालयांना कळविण्यात येत आहे की, मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे तासिका तत्वावर शिक्षक पदे भरण्यासाठीचे ना—हरकत प्रमाणपत्र घेतले असल्यास/घेऊन त्यानंतरच जाहिरात प्रस्ताव विद्यापीठामध्ये सादर करण्यात यावा. जाहिरातीचा नमूना सोबत देण्यात येत आहे.

उपरोक्त विषयांकित जाहिरात प्रस्तावासोबत शासनाचे ना—हरकत प्रमाणपत्र सादर केले नसल्यास जाहिरात मान्यतेची कार्यवाही करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

PSPandit

उपकुलसचिव

उप-कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Special Cell ★ Shivaji University, Kolhapur ★

सोबत : वरीलप्रमाणे

## संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्याकडे स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (CHB) भरावयाच्या शिक्षक पदांसाठीचा जाहिरात प्रस्ताव

संस्थेचे नाव :

महाविद्यालयाचे नाव :

पत्ता :

**पा हि जे त**

महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (CHB) खालील विषयांची शिक्षक पदे भरावयाची आहेत :

| क्र. | विषय | तासिका तत्वावर भरावयाच्या पदांची संख्या | अराखीव पदे | आरक्षणाची पदे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**शर्ती व अटी :**

१. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलल्या क्र. संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि. १४.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत असून या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

२. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा. क्र. विससं/उशि/कोवि/........... दि. .......... अन्वये ना—हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार ही जाहिरात देण्यात येत आहे. शासनाच्या या ना—हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

३. तासिका तत्वावरील शिक्षकांची (CHB) एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल व तदनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क नियुक्त शिक्षकास प्राप्त होत नसून भविष्यात कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी त्यास करता येणार नाही.

४. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या शिक्षकाकडून एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करत असल्याबाबतचे, इतर महाविद्यालयामध्ये काम करत नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १०० च्या स्टॅप पेपरवर संस्था/महाविद्यालय यांना सादर करणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हता, तासिका तत्वावरील वेतन इ. बाबी यासंदर्भातील शासन नियमानुसार राहतील.

६. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांची गणना खुल्या/अराखीव प्रवर्गात केली जाईल. आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रे सादर करावीत.

७. सदरची जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) अर्जदानांना पाहणीसाठी उपलब्ध आहे.

८. इच्छूक उमेदवारांनी दि.............रोजी अर्जासह आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्स प्रतींसह संस्था/महाविद्यालयात उपस्थित रहावे.

स्थळ:

दिनांक :

प्राचार्य (सही व शिक्का) संस्था सचिव (सही व शिक्का)